रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, जि.पालघर

## -ः नोटीस ः-

दि.१२.०३.२०१८

वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, **मंगळवार दि.१३.०३.२०१८** रोजी अनुक्रमे सकाळी **११.०० वा.** अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून महिला सुहासिनी पतसंस्था मोखाडा, ता. मोखाडा, जि.पालघर येथे अभ्यासभेटीचे आयोजन केले आहे तरी सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित रहावे.

प्राचार्य
**Principal**
Arts, Science & Com. College
Mokhada, Dist. Palghar

1) Waghade J.B. F.Y.B.Com
2) Chothe Vishwas G T.Y.B.Com

Arts, Science & Commerce, College
Mokhada

Scanned with Oken Scanner

रयत शिक्षण संस्थेचे

# कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोखाडा, जि. पालघर

## वाणिज्य विभाग अभ्यास भेट अहवाल

दि .१३.०३.२०१८ रोजी वाणिज्य विभांतर्गतमोखाडा येथील सुहासिनी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित जव्हार, शाखा मोखाडा या पतसंस्थेला भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहार आणि पतसंस्थेची कार्ये याविषयी प्रत्यक्ष माहिती अनुभवता यावी हा यामागील प्रमुख उद्देश होता. यावेळी विद्यार्थ्यांना पतसंस्थेचे कामकाज, दिली जाणारी कर्ज, त्यांची परतफेड आणि इतर अनुषंगिक सुविधा यासंबंधी माहिती दिली गेली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पतसंस्थेच्या अधिकारी वर्गाकडून समाधानकारक उत्तरे मिळाली. भेट दिल्याननंतर सर्व प्रथम शाखा व्यवस्थापक श्री. पवार ए. एन. यांचे विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तदनंतर त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांची ओळख करून दिली. महिला सक्षमिकरनाच्या दृष्टीने पतसंस्थेचे महत्त्व समजावून सांगितले.

या अभ्यासभेटीत श्री. पवार ए. एन. यांनी पतसंस्था म्हणजे काय? पतसंस्थेची कार्ये, ग्रामीण भागातील पतसंस्थेची भूमिका याविषयी मार्गदशन केले. तसेच Accounting Journal entries, Accounting Vouchers, Cheque Book, Payment Slip, Deposit Slip व इतर Vouchers यासंबंधी माहिती देऊन विविध स्लीप कशा भरावयाच्या याचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच Online entries व Data feeding ची माहिती सांगितली. अभ्यासक्रमातील एक महत्त्वाचा भाग या भेटीत अभ्यासन्यास मदत झाली, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहारांची माहिती व त्यात येणाऱ्या अडचणी यांचे निरसन करण्यात आले. एकूणच पतसंस्थेविषयीची परिपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

या अभ्यासभेटीत महविद्यालयातील एस. वाय. बी. कॉम आणि टी. वाय. बी.कॉम. या वर्गातील एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रा. जे. बी. वारघडे वाणिज्य विभाग प्रमुख आणि प्रा. व्ही. जी. चोथे यांच्या यशस्वी नियओजनामुळे अभ्यास भेट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासास नक्कीचा लाभदायक ठरेल.

वाणिज्य विभाग प्रमुख

Arts Science & Com. College ★ Mokhada ★

प्राचार्य
Principal
Arts, Science & Commerce College
Mokhada, Dist.Palghar

Scanned with Oken Scanner



Rayat Shikshan Sanstha's

Arts, Science & Commerce College, Mokhada, Dist: Palghar-401604.

**Email: asccmokhada@gmail.com**

**Website: www.asccmokhada.co.in**

**Affiliated to University of Mumbai, Mumbai**

---

## Department of Commerce - (2017-2018)

# Field Visit

**on**

## Mahila Suhasini Patasanstha – 13th March, 2018

Arts Science & Com. College ★ Mokhada ★



# Educational Visit





Scanned with Oken Scanner

# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा.

(उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम)

… पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट.)

प्राचार्य
Dr. Jadhav J.G.
MA, M.Phil Ph.D

जा. नं. : 513/2017-18.

दिनांक : 13/03/2018

प्रति,

मा. शाखा व्यवस्थापक

महिला सुहासिनी पतसंस्था मोखाडा

ता. मोखाडा, जि. पालघर

विषय: वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासभेटीबाबत.

महोदय,

वाणिज्य विभागातील अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून आपल्या पतसंस्थेतील कामकाज, कर्जसुविधा व उपलब्धता, पतसंस्थेची कार्ये आणि इतर अनुषंगिक माहिती याचे विद्यार्थ्यांना आकलन व्हावे यासाठी दि.१३.०३.२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. अभ्यासभेटीचे आयोजन केले आहे. तरी आपण आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

प्राचार्य
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
मोखाडा, जि. ठाणे

महिला … सहकारी … संस्था … नोंदणी क्र. ठाणे (जव्हार) RSR/CR ४८६ दि.२३-५-१९९६ मोखाडा, जि. पा…

ता. मोखाडा, जि. पालघर - ४०१ ६०४. फोन : (ऑ.) : ०२५२९/२५६६२८, (नि.) : ०२५२९/२५६७०६, (फॅक्स) : ०२५२९/२५६६२८

Scanned with Oken Scanner